पुण्यनगरी जनसंपर्क कक्ष
7 MAR 2017 शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात उद्या व्याख्यान

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या बेटी बचाओ अभियानांतर्गत समाजशास्त्र अधिविभागामार्फत आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त बुधवार, ८ रोजी सकाळी ११ वाजता व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. 'लेक वाचवा अभियान' या विषयावर 'स्त्री जन्माचे स्वागत करा' या चळवळीच्या प्रणेत्या डॉ. सुधा कांकरिया मार्गदर्शन करणार आहेत. हे व्याख्यान राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे.

लोकमत
7 MAR 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सुधा कांकरिया यांचे उद्या व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'स्त्री जन्माचे स्वागत करा' या चळवळीच्या प्रणेत्या डॉ. सुधा कांकरिया यांचे उद्या, बुधवारी सकाळी अकरा वाजता राजर्षी शाहू सभागृहात व्याख्यान होणार आहे. विद्यापीठाच्या बेटी बचाओ अभियानांतर्गत समाजशास्त्र अधिविभागामार्फत त्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यांच्या व्याख्यानाचा विषय 'लेक वाचवा अभियान' असा आहे.

- 7 MAR 2017 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इतिहासाचे वास्तववादी लेखन व्हावे : डॉ. राजा दीक्षित

## रूकडीत शिवाजी विद्यापीठाची इतिहास परिषद उत्साहात : तज्ज्ञांकडून इतिहासाची सखोल मांडणी

वार्ताहर
रूकडी

घडलेला इतिहास आणि लिहिलेला इतिहास यात दरी वाढत चालली आहे. संशोधकांनी घटनांचा शोध घेवून वास्तववादी लेखन केले पाहिजे, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पुणे येथील आंतरविद्याशाखा स्कूलचे प्रमुख व विद्यापीठ बीसीयुडी संचालक प्रा. डॉ. राजा दीक्षित यांनी केले. रूकडी येथील राजर्षि शाहू कला व वाणिज्य महाविद्यालयात रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रलच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या २२ व्या वार्षिक अधिवेशनात बोलत होते. अध्यक्षस्थानी बाळासो माने एज्युकेशन ट्रस्टच्या अध्यक्षा श्रीमती निवेदिता माने होत्या.

डॉ. दिक्षित म्हणाले, भारताच्या इतिहासात स्वातंत्र्याच्या लढ्याला फार महत्त्व दिले आहे. परंतु आता स्वातंत्र्याच्या लढ्याबरोबर समतेच्या लढ्यालाही महत्त्व दिले पाहिजे. इतिहासाकडे सामाजिक अंगाने पाहिले पाहिजे.



रूकडी : येथे शाहू महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी प्रा. डॉ. राजा दीक्षित, निवेदिता माने, प्राचार्य डॉ. अर्जुन राजगे, डॉ. भारती पाटील, प्राचार्य डॉ. अंकुल बेलवटकर, हिराचंद बरगाले व मान्यवर.

अधिवेशनाच्या अध्यक्षा डॉ. भारतीपाटील म्हणाल्या, इतिहास लेखनातही राजकारण होत असते. पुरूषांचा सर्वसाधारण इतिहास असतो तसा स्त्रियांचाही असला पाहिजे, इतिहासाच्या प्रत्येक पानावर अनेक स्त्रियांनी केलेल्या पराक्रमाचे व कार्याचे उल्लेख दिसून येतात. त्यामुळे स्त्रीयांचा इतिहास मांडला पाहिजे.

माजी खासदार निवेदिता माने म्हणाल्या, इतिहासाचे अभ्यासक हे समाजाला दिशा देण्याचे काम करीत असतात म्हणून इतिहासातील अनेक वाईट बाबींना धाडसाने खोडून काढले पाहिजे. सचिव धैर्यशील माने, प्राचार्य डॉ. अंकुश बेलवटकर यांनी मनोगत व्यक्त केले.

दुसऱ्या सत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची वैचारिकता या विषयावर प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे व डॉ. संतोष जेटीथोर यांनी तर डॉ. जयसिंगराव पवार यांचे इतिहास लेखनातील कार्य व योगदान या विषयावर प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील, प्राचार्य डॉ. आय. एच. पठाण व प्राचार्य डॉ. व्ही. एस. पवार यांनी आपले विचार व्याख्यानातून व्यक्त केले.

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विजापूरची आदिलशाही आणि मराठे यांचे संबंध या विषयावर विजापूर येथील डॉ. अब्दुलगणी इमारतवाले यांनी व्याख्यान दिले. समारोप सत्रात डॉ. अरूण भोसले यांनी सांस्कृतिक इतिहास लेखनात इतिहास लेखकांनी भरीव कार्य करण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन केले.

रोटरीचे हिराचंद बरगाले व सचिव हसमुख पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अर्जुन राजगे यांनी केले. डॉ. खंडेराव शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

श्रीमती माधवी सोळांकूरकर यांनी या परिषदेचे सूत्रसंचलन केले. परिषदेस शिवाजी विद्यापीठाच्या कोल्हापूर, सांगली, सातारा, सिंधुदूर्ग आणि सोलापूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील अनेक इतिहास प्राध्यापकांनी आणि संशोधकांनी सहभाग नोंदविला. डॉ. शर्मिला साबळे यांनी आभार मानले.

7 MAR 2017
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरू इलेव्हन, नागपूर, एस.पी.ची प्रतिस्पर्ध्यांवर मात

## विद्यापीठ कर्मचारी क्रिकेट स्पर्धा

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : अखिल महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत कुलगुरू इलेव्हनने अमरावतीच्या संत गाडगेबाबा विद्यापीठावर ६२ धावांनी विजय मिळविला. सागर पवारने ५४ धावांत ८१ धावा ठोकल्या. उर्वरित सामन्यांत नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व पुण्याच्या एस. पी. विद्यापीठाने आपापल्या प्रतिस्पर्ध्यांना हरविले.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडांगणावर स्पर्धा सुरू असलेल्या स्पर्धेत कुलगुरू इलेव्हनने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत चार गडी गमावून १७७ धावा फटकाविल्या. सागर पवारने ८१, विशाल हिलगे ३१, राजेश कोळी २६, रमेश ढोणुक्षे नाबाद १६ व विश्वनाथ वरूटेने पाच धावा केल्या. संत गाडगेबाबा विद्यापीठाकडून सुदर्शन कोरेने दोन, तर सतीश लोखंडेने एक गडी बाद केला. प्रत्त्युतरादाखल गाडगेबाबा विद्यापीठाला २० षटकांत नऊ गडी गमावून ११५ धावा करता आल्या. सतीश लोखंडेने नाबाद २८, मंगेश वरखडे २१, रवींद्र सरोदे १३, तर राजेश चिखलकरने ११ धावा केल्या. कुलगुरू इलेव्हनकडून सागर पवारने दोन, अजय आयरेकर, योगेश दळवी, अनिल पाटील व युवराज साबळेने प्रत्येकी एक गडी बाद केला.

नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाने शिवाजी विद्यापीठावर ५० धावांनी विजयाची नोंद केली. तुकडोजी महाराज विद्यापीठाने २० षटकांत आठ गड्यांच्या मोबदल्यात १५८ धावांचे उद्दिष्ट ठेवले. महेंद्र बनकरने ६२, सूरज सूर्यवंशी ४४, राकेश कोलुलकने १३ धावा केल्या. शिवाजी विद्यापीठाकडून संतोष खाडेने दोन, तर सिद्धार्थ लोखंडेने एक गडी बाद केला. प्रत्युत्तरादाखल शिवाजी विद्यापीठाने २० षटकांत सहा गडी गमावून १०८ धावा केल्या. विनायक शिंदेने २८, तर उदय करवडेने १३ धावा केल्या. तुकडोजी महाराज विद्यापीठाकडून रमेश शेवरे व राकेश कोपुलवारने प्रत्येकी दोन गडी बाद केले.

पुण्याच्या एस. पी. विद्यापीठाने राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाचा ७२ धावांनी पराभव केला. एस. पी. विद्यापीठाने १९.३ षटकांत दहा गडी गमावून १२७ धावा केल्या. सुनील माटे व समीर दिवेने प्रत्येकी १६ धावा केल्या. फुले कृषी विद्यापीठाला ११.१ षटकांत ५५ धावा करता आल्या. त्यांचे सर्व गडी बाद झाले. संदीप दिगुळेने १८ धावा केल्या. एस. पी. विद्यापीठाकडून मनीष गायकवाडने तीन गडी बाद केले.

7 MAR 201 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आजपासून चित्रपट महोत्सव

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग व दक्षिणायनतर्फे उद्यापासून (ता. ७) चित्रपट महोत्सवास सुरवात होत आहे. हा महोत्सव गुरुवारपर्यंत (ता. ९) असेल. स्त्रियांच्या संघर्षशील जीवनाची एक विवेकी, सशक्त, सकारात्मक बाजू महिला दिनाच्या निमित्ताने समाजासमोर यावी, यासाठी महोत्सव होत आहे. दक्षिणायन ही लोकशाही, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, सामाजिक न्याय व मानवी हक्क यासाठी लढणारा मंच आहे. पद्मश्री डॉ. गणेश देवी मंचचे संस्थापक, समन्वयक आहेत. दक्षिणायनच्या सहकार्याने महोत्सवात दिग्दर्शक अमोल पालेकर व संध्या गोखले यांनी स्त्रियांचे विविध प्रकारचे संघर्ष मांडलेले आठ चित्रपट दाखविले जाणार आहेत. स्त्री पात्र केंद्रस्थानीय असणारे देशी व विदेशी भाषेतील हे चित्रपट जगत्‌विख्यात दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केले आहेत.

- 7 MAR 2017 महाराष्ट्र टाइम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Maruti.Patil
@timesgroup.com
Tweet : @MarutipatilMT

# ऑनलाइन परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका बँक



**शिवाजी विद्यापीठ अन्य विद्यापीठांच्या दुप्पटीने विविध अभ्यासक्रमाच्या ६१४ परीक्षा घेते. किरकोळ अभ्यासक्रम वगळता १२० दिवसांच्या पुढे निकाल गेलेला नाही. गेल्यावर्षी परीक्षा पद्धतीमध्ये आणलेल्या सूसुत्रतेमुळे हे शक्य झाले आहे. एसआरपीडीद्वारे प्रश्नपत्रिकांचे वितरण केल्यामुळे परीक्षेतील गोंधळ शंभर टक्के कमी झाला आहे. आयसीटी प्रणाली वापर करण्यावर भर दिला असल्याने ऑनलाइन परीक्षा घेण्यासाठी प्रश्नपत्रिका बँक तयार करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे शिवाजी विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'शी बोलताना सांगितले.**

**टॉक टाइम**

**■ परीक्षा प्रक्रियेतील सुधारणांचा काय फायदा झाला ?**

प्रश्नपत्रिका ऑनलाइन पाठवल्यामुळे परीक्षा प्रक्रियेत कोणताही गोंधळ झाला नाही. बीएटीसी किंवा इतर कमी विद्यार्थी संख्या असलेल्या अभ्यासक्रमाच्या परीक्षा काहीवेळा पुढे जातात. एसआरपीडी किंवा अन्य कारणांमुळे परीक्षा पुढे गेल्या, पण त्याला तांत्रिक कारण नव्हते. प्रश्नपत्रिका तयार करण्याचे योग्य नियोजन झाल्याने प्रश्नपत्रिका वेळेत पोहोचल्या. त्यामुळे पहिल्या सत्रातील परीक्षांमध्ये कोणत्याही प्रकारच्या चुका झाल्या नाहीत. दुसऱ्या सत्रातील उत्तरपत्रिका सेंटरवर पोहोचल्या असून दूरशिक्षण विभागाच्या परीक्षा ज्या-त्या परीक्षा सेंटरवर होणार आहेत. पहिल्या सत्रात सुमारे अडीच हजार प्रश्नपत्रिका एसआरपीडीद्वारे पाठवल्या होत्या. दुसऱ्या सत्रात सुमारे साडेतीन हजार प्रश्नपत्रिका पाठवण्यात येणार आहेत. त्यामुळे गतवर्षी परीक्षा प्रक्रियेमध्ये केलेले बदल फलदायी ठरले आहेत.

**■ व्यावसायिक अभ्यासक्रमांचे निकाल वेळेत लागले का ?**

व्यावसायिक अभ्यासक्रमाचे निकाल काटेकोरपणे प्रसिद्ध करण्यासाठी सुप्रीम कोर्टाने १५ जूनपर्यंत निकाल लावण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे लेखी, प्रात्यक्षिक परीक्षा आणि उत्तरपत्रिका तपसणीचे पूर्ण नियोजन झाले आहे. गतवर्षी वेळेत निकाल प्रसिद्ध केल्यामुळे अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या सत्रांना ऑगस्टपासून सुरुवात झाली होती. तसेच उत्तरपत्रिका तपासणीसाठी प्राध्यापक उपलब्ध व्हावेत, यासाठी प्राचार्यांची लवकरच बैठक बोलवली आहे.

**■ उत्तरपत्रिका तपासणीचे नियोजन कसे केले आहे ?**

निकाल वेळेत लावण्यासाठी पारंपरिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा २० एप्रिलपर्यंत पूर्ण करण्याचे उद्दीष्ट आहे. प्राध्यापकांना उन्हाळी सुटी मिळण्यासाठी त्यापूर्वी उत्तरपत्रिका तपासणी पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे. ज्या प्राध्यापकांना उत्तरपत्रिका तपासणीसाठी सूचना केल्या जातात, त्यापैकी केवळ ६० टक्के प्राध्यापक उपस्थित राहतात. त्यामुळे नवीन कायद्याचा आधार घेऊन माजी प्राध्यापक व सीएचबीवरील प्राध्यापकांना या प्रक्रियेत आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यासाठी तीन वर्षे अध्यापनाचा अनुभव असलेल्या प्राध्यापकांची माहिती मागवली आहे. सर्व माहिती दहा मार्चपर्यंत संकलित करुन त्याचे नियोजन केले जाईल.

**■ पदवी प्रमाणपत्रातील दुरुस्त्यांसाठी काय उपाययोजना केल्या?**

पदवी प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन व ऑफलाइन अर्ज मागवले होते. ऑनलाइन अर्ज सादर करताना दुरुस्त्या अपेक्षित होत्या. तसेच पात्र यांद्या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्या होत्या. त्यातील २३ हजार पैकी १४० दुरुस्त्या केल्या. त्यासाठी परीक्षा विभाग दोषी नाही. संकेतस्थळावर याद्या प्रसिद्ध केल्यामुळे दुरुस्तीसाठी भरपूर कालावधी मिळाला. या चुकाही कमी करण्यासाठी एसडीएसएल सोबत सामंजस्य करार झाला आहे. त्यामुळे ऑनलाइनमध्ये विद्यार्थ्यांना दुरुस्ती करता येणार आहे. डीओटी ऑनलाइन प्रमाणपत्र पायलट प्रोजेक्ट अतंर्गत प्रमाणपत्र देण्यास सुरू करणार आहे. त्यामुळे ऑनलाइन टेम्पलेट तयार झाल्यानंतर विद्यार्थ्यांनाही मोफत सुविधा मिळेल.

**■ नवीन कायद्याचा काय फायदा होणार ?**

विद्यापीठाच्या नवीन कायद्यामध्ये परीक्षा प्रक्रियेसाठी आयसीटी वापरावर भर दिला आहे. त्यासाठी १९९४ च्या कायद्यात काही बदलही केले आहेत. त्यामुळे आयसीटी वापर मुक्तपणे करता येणार आहे. याद्वारे ऑनलाइन परीक्षा घेण्यासाठी प्रश्नपत्रिका बँक करण्याची मुभा मिळाली आहे. त्यामुळे योग्य ठिकाणी आयसीटीचा वापर करुन नवीन प्रयोग राबवता येणार आहेत. पात्र व्यक्ती पात्र प्राध्यापक उत्तरपत्रिका तपासणीसाठी मिळणार आहेत. यासाठी विद्याशाखा आणि बोर्ड ऑफ स्टडीकडून मान्यताही घेण्यात येणार आहे.

- 7 MAR 2017 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकमान्यांचे विचार आत्मसात करणे आवश्यक

## कुलगुरू डॉ. दीपक टिळक यांचे प्रतिपादन : राजकीय परिवर्तन घडवण्यासाठी मनोबलाची आवश्यकता

प्रतिनिधी
कोल्हापूर

स्वराज्यात सामाजिक, आर्थिक व राजकीय परिवर्तन घडवून आणण्यासाठी कायद्याची नव्हे, तर व्यक्तीच्या मनोबलाची आवश्यकता लोकमान्य टिळकांना अभिप्रेत होती. बदललेल्या परिस्थितीत लोकमान्यांचे सामाजिक, आर्थिक व राजकीय विचार नव्याने आत्मसात करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दीपक टिळक यांनी केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. अशोक चौसाळकर होते.

शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभाग व गांधी अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्वराज्य संकल्पना व त्याचे सद्यकालीन औचित्य' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ व डॉ. अवनीश पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ. टिळक म्हणाले, "लोकमान्य टिळक हे केवळ राजकीय पुढारी नव्हते; तर ते अर्थतज्ज्ञही होते. स्वतंत्र भारताचे स्वतंत्र अर्थकारण असावे, असा आग्रह त्यांनी धरला होता. ज्या काळात सूक्ष्म अर्थशास्त्राची कल्पनाही अस्तित्वात नव्हती; त्या काळात त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेचा सूक्ष्मरीत्या अभ्यास केला होता. लोकमान्य टिळकांनी, 'शेतकरी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे शेतीवर आधारित उद्योगधंद्यांची निर्मिती केली पाहिजे,' असा आग्रह त्यांनी धरला होता. लोकमान्यांचे हे विचार पुन्हा नव्याने आत्मसात करणे आवश्यक आहे."

किशोर बेडकीहाळ म्हणाले, "गांधी विचार समजून घेणे, हे एक बौद्धिक आव्हान आहे आणि ते तरुणांनी स्वीकारले पाहिजे. महात्मा गांधींची स्वराज्याची संकल्पना अध्यात्मावर आधारलेली होती. स्वराज्यात प्रत्येकाला किमान गोष्टी उपलब्ध झाल्या पाहिजेत, असा गांधीजींचा आग्रह होता." सामाजिक, आर्थिक व राजकीय समानता गांधीजींच्या स्वराज्यविषयक विचारातील आत्मा आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. अवनीश पाटील यांनी सांगितले, की 'बाबू चित्तरंजन दास हे क्रांतिकारी विचारवंत होते. देशासाठी बलिदान करणे, हा भारतीयांचा आदर्श आहे. मात्र, तो आज आपण विसरून गेलो आहोत. त्यामुळे आज देश कमकुवत बनला आहे.' चर्चासत्राच्या समारोपाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूरचे कुलगुरू प्रा. डॉ. दयानंद माने उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. माने यांनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वराज्यविषयक विचारांची मांडणी केली. ते म्हणाले, "डॉ. आंबेडकरांनी स्वराज्याला विरोध केला नाही. त्यांना भारतीयांचे स्वराज्य आवश्यकच होते. मात्र, त्यांना प्रथम केवळ राजकीय स्वराज्य नव्हे; तर सामाजिक व आर्थिक स्वराज्य अभिप्रेत होते." कार्यक्रमाला विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. भारती पाटील, डॉ. रवींद्र भणगे यांची उपस्थिती होती. चर्चासत्राच्या शेवटच्या दिवशी 'स्वराज्यविषयक गांधीवादी दृष्टिकोन' व 'स्वराज्याचा क्रांतीकारी दृष्टिकोन' या विषयांवर संशोधकांकडून २० शोधनिबंध सादर करण्यात आले.

पुढारी

7 MAR 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. सुधा कांकरीया यांचे शिवाजी विद्यापीठात उद्या व्याख्यान

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या बेटी बचाओ अभियानांतर्गत समाजशास्त्र अधिविभागामार्फत आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त दि. ८ मार्च रोजी सकाळी अकरा वाजता 'लेक वाचवा अभियान' या विषयावर स्त्री जन्माचे स्वागत करा या चळवळीच्या प्रणेत्या डॉ. सुधा कांकरीया यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात व्याख्यान होणार आहे. तरी या उपक्रमास सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र टाईम्स
7 MAR 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मुक्त विद्यापीठाच्या कुलगुरूपदी डॉ. वायुनंदन



नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पंधराव्या कुलगुरूपदी डॉ. ई. वायुनंदन यांची निवड करण्यात आली. राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी सोमवारी राज्यपाल भवनात ही निवड केली.

मुक्त विद्यापीठाच्या कुलगुरूपदासाठी प्रमोद येवले, मोहन काशिकर आणि ई. वायुनंदन या तिघांची नावे शॉर्टलिस्ट करण्यात आली होती. प्रमोद येवले यांच्या नावाची शेवटपर्यंत चर्चा होती. मात्र ई. वायुनंदन यांचा अॅकॅडेमिक बायोडेटा वजनदार भरल्याने त्यांची या पदावर निवड झाली.

डॉ. ई. वायुनंदन हे इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठात ऑगस्ट १९८७ पासून कार्यरत आहेत. त्यांनी आपत्ती व्यवस्थापन या विषयात पदविका घेतलेली असून, सामान्य प्रशासन विषयात एम. ए. केलेले आहे. ते एम.फिल. व पीएच.डी.देखील आहेत. वैयक्तिक कारणास्तव कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी पदाचा राजीनामा दिल्याने गेल्या सहा महिन्यांपासून कुलगुरूपद रिक्त होते.

राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या सुचनेनुसार महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसेकर प्रभारी कुलगुरूपद सांभाळत होते.